MHAH080015062014

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ११३/२०००</u>**

**<u>मधील नि. २१६ वरील आदेश</u>**

*<u>(आण्णा पंढरीनाथ लेंडे व इतर</u>*

*<u>विरुद्ध</u>*

*<u>गणपत बाबुराव लेंडे व इतर)</u>*

**<u>(दिनांक १२/०१/२०२६ रोजी)</u>**

सदर अर्ज वादीने दावा पॅरा क्र. ३ब मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ तसेच, प्रतिवादी क्र. ६, ७ व ८ यांचे विरुद्ध वाटप तसेच विरोधी कब्जाने मालक झाल्याबाबत जाहीरनामा मिळण्यासाठी दाखल केला असताना, सदर दाव्याच्या विनंती कलमांमध्ये त्या अनुषंगाने मागणी करणे आवश्यक होते. परंतु, त्याबाबत विनंती कलमांमध्ये मागणी करण्याचे राहून गेल्याने सदर मजकूर विनंती कलमात नमूद करून वाद घटनांमध्ये स्पष्टता येणे आवश्यक आहे. सदर कथनाबाबत मुद्दे काढण्यात आलेले असून त्याबाबत वादीने पुरावा दिलेला आहे. त्यामुळे सदर मजकूर विनंती कलमात नमूद करणे आवश्यक असून सदर दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही असे वादीचे कथन आहे. त्यामुळे सदर मजकूर विनंती कलमांमध्ये नमूद करून त्यानुसार दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. २ ते ५ व १२ ते १५ तर्फे सदर अर्जावर निशाणी २१८ अन्वये म्हणणे दाखल करून वादीचा अर्ज हा कायदेशीर नसून अशा स्वरूपाचे क्लारिफिकेशन देऊन दुरुस्ती करण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अर्जामध्ये नमूद केले नसल्यामुळे वादी यांचा अर्ज रद्द करण्यात यावा असे नमूद करून यदाकदाचित अर्ज मंजूर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास वादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट करावी अशी विनंती केली आहे.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला, अभिलेखावरील एकंदर वादकथन व परिस्थिती पाहता वादी यांनी मागणीप्रमाणे वाटप तसेच त्यात अनुषंगिक बाब म्हणून विरोधी कब्जाने मालक झाल्याबाबत वादकथन नमूद केले आहे. परंतु, सदर मागणी बाबत विनंती कलमांमध्ये विनंती केलेली दिसून येत नाही. सदर दुरुस्ती ही वादकथनात स्पष्टता येऊन वादीची विनंती स्पष्ट होण्यास मदत करणारी असली तरीही सदर अर्ज वादी यांनी अंतिम युक्तीवादाचे वेळी अंतिम टप्प्यावर दिलेला आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूपात कोणताही बदल होणार नसून सदर दुरुस्ती वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा प्रश्न निर्णित करण्यासाठी आवश्यक आहे. परंतु, सदर अर्ज दाखल करण्यास वादी यांनी केलेला विलंब पाहता सदर अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतोः-

| **-आदेश-** | |
|---|---|
| १. | अर्ज (नि.२१६) खर्चासह मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी यांनी प्रतिवादी क्र. २ ते ५ व १२ ते १५ यांना खर्च रक्कम रु. २,०००/- द्यावा. |
| ३. | दावा २५ वर्ष जुना असल्याने वादी यांनी सदर दुरुस्ती आजच करून तात्काळ दुरुस्त प्रत सादर करावी व दावा पुन्हा अंतिम युक्तीवादासाठी ठेवण्यात यावा. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2026.01.13 18:01:02 +0530

संगमनेर.
दिनांकः- १२/०१/२०२६.

**(श्रीमती एस. बी. ढवळे.)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
संगमनेर.